# नीती आयोग

**सीताराम नारायण खडपकर** , संशोधक विद्यार्थी, **अर्थशास्त्र विभाग** ,**शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर**.

.................................................................................................................................................

**प्रस्तावनाः-** १५ मार्च १९५० रोजी स्थापन झालेला २०० लाख कोटी रूपयाहुन अधिक खर्चाचा १२ पंचवार्षिक आणि ६ वार्षिक योजना आखणारा तसेच ६५ वर्षे जुना पंडित नेहरू यांनी सुरू केलेला नियोजन आयोग मोडित काढण्यात आला. बदललेल्या अर्थकारणाला सुसंगत असा नवीन नीती आयोगाची म्हणजे नॅशनल इन्स्टीटयुट फॉर ट्रान्सफॉरमिंग इंडिया किवा राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्थाची सुरूवात १ जानेवारी २०१५ पासून झाली. पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली हा आयोग केंद्र व राज्य सरकाराना धोरण आखणीसाठी विचारगट म्हणून म्हणून कार्य करणार आहे. या नवीन नीती आयोगात सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रषासित प्रदेशाचे राज्यपाल यांचा समावेष असणा-या कार्यकारी मंडळाच्या सहभाग असून परस्पंर सहकर्याच्या तत्वावर संघराज्याचा विकास साधण्यासाठी केंद्र राज्यासाठी समान राष्ट्रीय कार्यक्रम आखण्यात हे मंडळ महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. बलशाली रांज्याच्या आधारावरच देश बलवान होतो. या सूत्रानुसार राज्यांच्या विकासावर नीती आयोगाचा भर रहाणार आहे.

**निती आयोगाची रचना**

**अध्यक्षः-**देशाचे पंतप्रधान आयोगाचे अध्यक्ष असतील. मा. श्री. नरेंद्र मोदी हे नीती आयोगाचे पहिले अध्यक्ष ठरले आहेत.

**उपाध्यक्षः-**पंतप्रधान उपाध्यक्षांची नेमणूक करतील. नामवंत अर्थतज्ञ श्री. अरविंद पनगारिया यांची नीती आयोगाच्या उपाध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली आहे. श्री. अरविंद पनगारिया हे कोलबिया विद्यापीठात अर्थशास्त्रांचे प्राध्यापक आहेत. त्यांनी आशिया विकास बॅकेत प्रमुख अर्थतज्ञ म्हणून काम केलेले असून अर्थतंज्ञ श्री. जगदीश भगवती यांच्याबरोबरWhy Growth Matters: How Economic growth in India reduced poverty and the lessons for other developing countries rlsp India's Tryst with Destiny. Debunking and Myths that undermine progress and addressing new challen ही पुस्तके लिहिली असून ती जगप्रसिद्ध ठरली आहेत.

**पूर्णवेळ सदस्यः-**या संस्थेत पाच स्थायी सदस्य असतील. सध्या श्री. विवके देबरॉय आणि डॉ. व्ही.के. सारस्वत यांची पूर्णवेळ सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. श्री. विवके देबरॉय हे अर्थतज्ञ असून त्यांनी India, Redeeming the Economic pledge, Transforming rengal, India labour report 2008, 2009

अशा पुस्तकांसाठी सीलेखन केलेले आहे. डॉ. व्ही.के. सारस्वत हे भारतीय शास्त्रज्ञ असून त्यांनी DRDO चे महासंचालक तसेच संरक्षण मंत्रालयाचे प्रमुख शास्त्रज्ञ सल्लागार म्हणून काम पाहिलेले आहेत.

**अर्धवेळ सदस्यः-**कमाल २ तंज्ञाची विद्यापीठ किंवा संशोधन संस्थामधुन निवड केली जाईल. हे पद बदलत रहाणारे असेल.

**पदसिद्ध सदस्यः-**केंद्रीय मंत्रिमंडळातून किमान ४ मंत्र्याची पदसिद्ध सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सध्या राजनाथसिंह अरूण जेटली, सुरेश प्रभू आणि राधामोहन सिंग यांची पदसिद्ध सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारीः-**विशिष्ट कालावधीसाठी पतंप्रधानाद्वारा सचिव स्तरावरील व्यक्तींची मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नेमणूक केली जाईल. सध्या पूर्वीच्या नियोजन आयोगाच्या सचिव सिंधूश्री खुल्लर यांची मुख्य कार्यकारी अधिारी पदावर नेमणूक झालेली आहे.

**प्रशासकीय परिषदः-**नीती आयोगात पूण वेळ संस्थे बरोबरच प्रशासकीय परिषद कार्यरत असेल. यात सर्व राज्यांचे मुख्यमंत्री व केंद्रशासीत प्रदेशांच्या नायब राज्यपालांच्या समावेश करण्यात आला आहे.

**प्रादेशिक परिषदः-**ठराविक विषय व एक किंवा अनेक राज्यांशी निगडीत आकस्मित व इतर विषायांसाठी पंतप्रधान प्रादेशिक परिषद स्थापन करतील. या समितीत त्या प्रदेषातील राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या व केंद्रशासीत व प्रदेशांच्या नायब राज्यपालांचा समावेश असेल. प्रादेशिक परिषद गरजेनुसार स्थापन होईल. या परिषदेचे अध्यक्ष हे नीती आयोगाचे अध्यक्ष किंवा त्यांनी नेमणूक केलेली व्यक्ती असले.

**विशेष आमंत्रित सदस्यः**पंतप्रधानाद्वारातंज्ञ विषेशज्ञ किवा तत्सम ज्ञान असणा-या व्यक्तींची नेमणूक करण्यात येईल. या सदस्याची कमाल संख्या निष्चित नाही. सध्या नितीन गडकरी यावर चंद गेहलोत आणि स्मृती इराणी या मंत्र्यांची नेमणूक विषेश आमंत्रित सदस्य म्हणून करण्यात आली आहे.

**नीती आयोग व योजना आयोग यामधील फरक**

| **नीती आयोग** | **योजना आयोग** |
| --- | --- |
| आयोग बाबतीत नीती आयोग सल्लागार मंडळ किवा थिंक टॅंक म्हणून काम करणार आहे. | केंद्र सरकारची विविध मंत्रालय व राज्यांना निधी वाटप करण्यात महत्त्वपूर्ण वाटा. |
| या आयोगामध्ये दोन पूर्णवेळ सदस्य असणार. | योजना आयोगात ८ पूर्णवेळ सदस्य होते. |

| | |
|---|---|
| राज्यांना महत्त्वाचे स्थान मिळणार. | राज्यांची भूमिका केवळ राष्ट्रीय विकास प्ररिषदे पुरती मर्यादित. |
| उपमुख्य कार्यकारी अधिकारी नेमण्यात येणार | सचिव किंवा सदस्य सचिव नेहमीच्या पद्धतीने नेमण्यातयेत असे. |
| गरजेनुरूप अर्धवेळा सदस्यांची नेमणूक करणार. | अर्धवेळ सदस्य नेमण्याची तरतूद नव्हती. |
| प्रादेशिक प्रश्नांचे प्रादेशिक परिषदेद्वारा नियोजन शक्य आहे. | प्रादेशिक प्रश्नांना अल्प महत्व होते. |

**नीती आयोगाची उद्दिष्ट .** विकास प्रक्रियेत योग्य दिषा व धोरणात्मक आदाने पुरविणे नीती आयोगाचे प्रमुखकार्य असेल. नियोजन आयोगाने केंद्राकडून-राज्याकडे असा नियोजनाचा एकेरी प्रवाह निर्माण केला राज्यांच्या सक्रिय व निरतंर सहभागाने नियोजन आखले जाणे नीती आयोगाला अपेक्षित आहे. नियोजना पेक्षाही केंद्र व राज्य शासनांना धोरणात्म व तांत्रिक सल्ला पुरविणारी वैचारिक संस्था (thing-tank) उदयास येणे अपेक्षित आहे. आंतर मंत्रालयीन व केंद्र राज्य समनवय साधुन विकासाठी संघराज्य व सशक्त राज्ये सशक्त राष्ट्र निर्मितीस सर्वोच्य प्राधांन्य दिले जाईल. यासाठी निती आयोग खालील उद्दिष्टांची आणि संधीची पुर्तता करेल.

१. प्रशासन आमुलाग्र बदल करणे. जेणेकरून शासन हे पहिले किंवा अंतिम त्राता न राहता कारक व्हावे.
२. अन्न सुरक्षिते बरोबरच कृषी उत्पादन व शेतक-यांना योग्य मोबदला मिळविण्यासाठी प्रयत्न करणे.
३. जागतिक प्रश्नांवर भारतास सक्रिय सहभागी करणे.
४. मध्यम वर्गास अर्थव्यवस्थेत संक्रिय सहभागी करून त्यांची पूर्ण क्षमता वापरणे.
५. देशातील व्यवसायिक, वैज्ञानिक व बौद्धीक क्षमतेचा मानवी भांडवलाचे वर्धन करणे.
६. अनिवासी भारतीयांच्या भूआर्थिक व भू राजकीय क्षमतांचा वापर करणे.
७. शासनातील गैर पद्धती दूर करण्यासाठी व पारदर्शक कारभारासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे.

**नीती आयोगाची कार्येः-**

१. योजना अमंलबजावणीवर देखरेख आणि त्यांच्या मूल्यांकना बरोबर तंत्रज्ञान सुधार (टेक्नॉलॉजी अपग्रेडेशन) करणे.
२. निती आयोग पंचवार्षिक योजना आणि राज्यांमध्ये निधी वाटपाचे काम पूर्वीच्या नियोजना आयोगाप्रमाणे करणार नाही.
३. निती आयोग राज्यांच्या सल्ल्याने देशाच्या विकासाचा राष्ट्रीय अजेंडा तयार करून तो पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांना सोपवले.
४. सक्षम राज्य व सशक्त देशाच्या सिध्दांतावर हा आयोग काम करणार आहे.
५. जिल्हा स्तारापासुन केंद्र स्तरापर्यंत योजना लागू होतील अशी यंत्रणा तयार करण्याची जबाबदारी निती आयोगाकडे असेल.
६. धारेण कर्ते आणि संबंधीत क्षेत्राच्या तज्ज्ञाच्या सहकार्याने आर्थिक धोरणात राष्ट्रीय सुरक्षेची ही जबाबदारी साभाळण्याचे हे काम निती आयोग करेल.
७. केंद्र व राज्य सरकारांना धोरणात्म मुद्दयावर रणनितीक आणि तांत्रिक सल्ला देण्याचे कार्य हा आयोग करेल.
८. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दृष्टया महत्त्वाच्या आर्थिक मुद्दयाचा समावेश या आयोगात असेल.
९. नीती आयोग अन्य राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय (थिंक टॅंक) शिवाय शैक्षणिक व धोरणात्मक संशोधन संस्थांच्या सपर्कात रहाणार आहे.

थोडक्यात निती आयोग सरकारसाठी एक मार्गदर्शक आणि निती प्रोत्साहक म्हणून कार्य करेल. तसचे केंद्र आणि राज्य यांना जोडणा-या पुलाप्रमाणे कार्य करेल. राज्य आणि केंद्र यांच्यात समन्वय निर्माण करले. निती आयोग सहयोगी संघराज्य तत्वाला वेग देवून केंद्राचे कार्यक्रम राज्यामध्ये राबविण्यास मदत करणार असून जनता भिमुखी व कृतीशिल कार्य करणार आहे. जनतेचे सशक्ती करण केले जाईल आणि देशात समानता आणण्यासाठी सहभाग तत्वावर विकास कार्यक्रमांची अमंबल बजावणी हा आयोग करणार आहे. निती आयोग ग्रामीण स्तरावर विश्वसनिय योजना तयार करण्यासाठी तंत्र विकसित करणार असून त्यासदर्भातील योजना उत्तरोत्तर उच्च पातळीवर नेण्याचे कार्य करणार आहे. निती आयोगाकडे विशेषता आर्थिक धोरण व राष्ट्रीय सुरक्षा यांच्या हिताकडे लक्ष देण्याचे काम सोपविण्यात आले आहे. तसेच आर्थिक दृष्टया मागसलेल्या सामाजिक वर्गावर विशेष लक्ष देण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. देशाची व्यूहरचना आणि दिर्घकालीन धोरणांचा आराखडा तयार करण्याचे व त्या दिशेने काम पहाण्याचे कार्य निती आयोग पहाणार आहे. देखेरेख व प्रतिक्रिया यांच्या आधारे धोरणांचा मध्यावधी आढावा घेण्याचे आणि आवश्यकतेनुसार सुधारण करण्याचे कार्य निती आयोग करणार आहे. त्याच बरोबर निती आयोगामुळे सरकारच्या विकसीत कार्यक्रमाचे कार्यान्वयन जलद गतीने करण्यासाठी देशातर्गंत आणि क्षेत्रिय मुद्दयावर तोडगा काढण्यासाठी हा आयोग एक व्यासपीठ म्हणून कार्य करणार आहे.

आज पर्यंत योजना आयोगाच्या योजना या प्रभावीपणे राबविल्या गेल्या नाहीत योजनांची अमंबजावणी करण्याची राजकीय इच्छाशक्तीच मुळात नव्हती. त्यामुळे म्हणवा तेवढा देशाचा विकास झालेला दिसून येत नाही. योजना तयार करताना त्याचे योग्य नियोजन खर्चाचा ताळमेळ दर्जा गुणवत्ता व कालावधी यांचा विचार अधिक प्रखरपणे न केल्याने योजना आयोगाची अंमलबजावणी काटेकोरपणे झालेली नाही. योजना आयोगाच्या कार्यप्रणालीमुळे राज्यांच्या स्वयतेवर अनेक बंधने येत होती. राज्यांना आपल्या गरजा आणि विवेकानुसार विकासाचे मॉडेल लागू करण्याची मुबा नव्हती. प्रत्येक राज्यांच्या गरजा या वेगवेगळया असतात. तेथील साधने व सुविधा हया देखील भिन्नभिन्न असतात. त्यामुळे विकासाला म्हणावी तेवढी गती मिळाली नाही. पणे नव्याने सुरू होणारी निती आयोगाने योजना आयोगाच्या त्रुटी बाजुला सारून राज्यांच्या भुमिकेला महत्त्व आणि स्वयत्ता देणे गरजेचे आहे.

योजना आयोग देशासमोरील आव्हानांचे आकलन करू शकला नाही. म्हणूनच तो असफल राहीला. निती आयोगाला जागृक राहणे गरजेचे आहे. योजना आयोगात सेवा निवृत्त सरकारी अधिकारी असल्याने हे अधिकारी वेळ काढूपणा करत असत. त्यांच्या वयोमानाप्रमाणे महत्त्वाकांक्षी योजना आखण्याची व स्वतंत्र्य विचार करण्याची क्षमता संपली होती. आता नव्याने स्थापन झालेल्या आयोगात सरकारी निवृत्त अधिकारा-यांपेक्षा संशोधक शेतकरी वेगवेगळया विषयातील तंज्ञ अर्थशास्त्रज्ञ स्वयंसेवी संस्था व तरूण सदस्य असतील तर त्यांना काही तरी करून दाखवण्याची प्रबळ इच्छाशक्ती असेल म्हणून सर्व क्षेत्रातील तंज्ञ व्यक्तींची नियुक्ती यात करणे गरजेचे आहे.

**तळापासून वर जाणारे नियोजन**

भारताला तळापासून वर जाणा-या नियोजनाची आवश्यकता असून त्यावरच निती आयोग भर देणार आहे. घटनेतील कलम २४३ जी. २४३ डब्ल्यू आणि २४३ झेड डी. तसेच २४३ झेड इ. यांचा विचार करून नवीन धोरण निश्चिती करण्यात येणार आहे. या कलमामध्ये निम्न ते उच्चस्तरीय नियोजन कशा प्रकारे केले जाते हे स्पष्ट करण्यात आले आहे. ग्रामीण आणि नागरी स्थानिक सरकारांकडे अधिकार नियमांचे अधिकार आणि जबाबदा-या यांची सुत्रे सोपविण्यात येणार आहेत. एखाद्या संस्थेसारखे स्वतःचे सरकार चालेविले जावे स्वशासित सरकारातील कार्ये संस्थेसारखी पार पाडली जावीत. त्याचबरोबर आर्थिक विकासाचा आणि सामाजिक न्यायाचा आराखडा आवश्यक असल्यास तयार करावा.

प्रत्यक राज्याला २४६३ झेड.डी. कलम अनिवार्य करण्यात येईल. यानुसार जिल्हया नियोजन समिती तयार कराव्या लागतील. आणि महानगरामध्ये २४३ झेड.इ. अंतरर्गत महानगरीय नियोजन समिती स्थापल्या जातील. जिल्हा नियोजन समिती सगळया पंचायतीच्या आणि नगरपालिका नियोजनांचे एकत्रिकरण करून सपूर्ण जिल्हयासाठी विकास आराखडा तयार करेल. विशेष म्हणजे या आराखडयांमध्ये नैसर्गिक साधन संपत्तीच्या संवधनासाठी परिणाम कारक उपाययोजना हा मत्वाचा भाग असणार आहे. आराखडयाच्या अंमलबजावणीची वैधताही विशिष्ट गोष्टी विचार घेवून निश्चित करण्यात येणार आहे. जगाच्या पाठीवर भारता इतकी मोठी लोकशाही कुठेच नाही. मजबूत लोकशाहीमुळे मिळालेले अधिकार अनुभवणारा भारत हा अद्‌वितीय देश आहे. २.५ लाख पंचायती ३८४२ नागरी स्थानीक संस्था यामध्ये कार्यरत असणारे जनतेचे प्रतीनिधी म्हणजे भारताकडे असलेली अमर्याद शक्ती आहे. ज्या जोरावरच अनेक संधी उपलब्ध होवू शकतात. आणि देश प्रगतीचे ध्येय गाठू शकतो. मात्र यासाठी सर्व स्तरीय नियोजनाची आवश्यकता या देशाला आहे. सर्वात प्रथम ग्रामसभा नंतर जिल्हया नियोजन समिती मग राज्य नियोजन समिती आणि इतर संस्था यांच्या मार्फत लोकांचा सहभाग अपेक्षीत आहे. याप्रमाणे योग्य चौकट तयार करून त्या दिशेने काम करता येणार आहे. याचे अतिशय उत्तम  उदाहण केरळ राज्यांचे देता येईल.

जर राजकीय इच्छाशक्ती असेल तर स्थाहनक पातळीवर लोकशाहीला चांगल्या प्रकारे वाव मिळतो... हे केरळने सिध्द करून दाखवले आहे. ग्रामपंचायती पासुन नियोजन कार्यक्रमात लोकांचा सहभाग आणि जागुती वाढवली. सेन समितीच्या शिफारसींचाही विचार केरळमध्ये केला गेला. ग्रामसभेमध्ये लोकांच्या गरजांचा विचार केला जोतो. आणि त्याकांमांना जिल्हा नियोजन समितीकडून प्रशासकीय मान्यता दिली जाते. प्रत्यक पंचायत आणि नगरपालिका विकास अहवाल करतात. हे यश काही किरकोळ नाही. विकास विषयक परिषदामध्ये तंज्ञाची चर्चा केली जाते. त्याप्रमाणे प्रत्येक क्षेत्रांचा विचार करून त्याची चर्चा करतात. आगामी काळासाठी ध्येय निश्चित केले जाते. इतकेच नाही तर त्यांनी क्षेत्रीय कृतीदल तयार केले आहे. अशा दलामध्ये काम करणारे १० ते १२ लोक आहे. त्यांच्यावर प्रकल्प तयार करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. विशेष म्हणजे विकास परिषदांचे  नियोजन प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये आणि नगरपालिकांमध्ये केले जाते. अशा परिषदामध्ये ग्रामसभा सदस्य राजकीय पक्षांचे नेते स्थानिक तंज्ञ आधी सहभागी होतात. यासगळयांचा एकत्रित परिणाम म्हणजे लोकांचे प्रश्न सोडविणे सापे झाले. आणि विकास पकरषदामुळे या सपूर्ण प्रक्रियेचेच यशस्वीपणे विकेंद्रीकरण होवू लागले. नवीन सरकार जर खरोखरच तळापासुन नियोजन करण्याविषयी  गांभीयाने विचार करती असेल तर केरळ सरकारने या विषयी खूप चांगले काम केले असून ते मार्गदर्श ठरू शकणार आहेत. पश्चिम बंगालमध्ये २००६-०७ पासून नियोजन कामाला प्रारंभ झाला आहे.

**निती आयोगः अर्थव्यवस्थेची गरज** नियोजन आयोगाचे निती आयोगात रूपांतर करणे हा एक महत्त्वाचा टप्पा आहे निती आयोग हा नियोजनासाठी नाही तर धोरणात्मक निर्णयासाठी स्थापन झालेला आहे. निती आयोगात पहिल्यांदाच सर्व राज्यांच्या मुख्य मंत्र्यांना यात जोडले गेले आहे. यामुळे अशा प्रकारची निती होवू शकेल की सर्वात खालच्या स्तरापर्यंत लागू करता येईल

कारण प्रत्येक राज्यांचा विकास हा एकाच नितीने होवू शकत नाही. प्रत्येक राज्यातील विकासाची गती समस्या वेगवेगळी असते. काही राज्ये प्रगत असतात काही मागसलेली काही मोठी काही लहान म्हणून या निती आयोगात या सर्व बाबीचा विचार करून कार्यव रचना केलेली आहे.

निती आयोगामुळे केंद्र व राज्य यांच्या संबंधांचा विधायक दिशेने प्रवास सुरू झाला आहे. त्यामुळे संसाधनांचा विनियोग ठरविताना ती केंद्र व राज्यांच्या संवादातून ठरविता येईल. राज्यानी मागणी करायच्या व केंद्राने त्या द्यायच्या असे न होता देशाच्या विकासाठी एकत्रित विचार होईल त्याचबरोबर ज्या प्रदेशाचा मानवी विकास निर्देशांक कमी आहे आणि जो समाज वंचीत आहे त्यांच्या विकासाठी संबंधीत मंत्री व निती आयोगातील प्रतिनिधी विचांरमंथन करून निर्णय घेवू शकणार आहेत. त्याचबरोबर केंद्राची एखादी योजना एखद्या राज्यांत यशस्वी ठरली तर ती यशस्वी ठरण्यामागचे गमक कळेल. व ते इतर इतर राज्यांत नेण्यासाठी निती आयोग हा मत्त्वाचा मार्ग ठरू शकेल. भारतातील प्रत्येक राज्यांचे प्रश्न हे वेगळे आहेत. तेथील विशिष्ट पूर्णता यांचा सखोल विचार होवून निधीचे वाटप झाले तर हया आयोगाने मोठे यश संपादन केले असे म्हणता येईल.

भिन्न योजना केंद्र सरकारच्या माध्यमातून राबविल्या जातात. परंतू या योजना किंवा या संबंधी एखादा कार्यक्रम एखाद्या मंत्रालया पुरता मर्यादित नसतो. इतर खाती व संस्था यांचापणे संबंध कुठेना कुठे असतो. अशांना यात समाविष्ट केले तर संबंधीत योजना यशस्वी होवू शकते.

प्रत्येक राज्यांची भिन्नभिन्न क्षमता व परिस्थिती असते त्यामुळे सर्व राज्यांत एकाच पध्दतीने योजना राबविणे चुकीचे होईल ही बाब लक्षात ठेवून या संदर्भातील एकक असे ठरवावे याची प्रक्रिया निती आयोग निश्चित करू शकेल. सर्व समाविशेक विकासाच्या दृष्टीने योग्य पावले उचलण्याचे काम निती आयोगाला करावे लागणार आहे. निती ओयाग आला म्हणजे योजना आयोग कुंचकामी होता असे नाही. तर योजना आयोगाच्या अनुभवावर व शिदोरीवर या आयोगाला वाटचाल करावी लागणार आहे. थोडक्यात निती आयोग केंद्र व राज्य सरकारासाठी थिंक टॅक म्हणून कार्य करणार आहे.

जग भरात तीन हजार थिंक टॅक असून सर्वाधिक थिंक टॅक अमेरिकेत आहे. या थिंक टॅगचा जगाच्या आर्थिक धोरणांवर मोठा प्रभाव दिसून येतो. पहिल्या १५० थिंक टॅग मध्ये ६ भारतीय थिंक टॅगचा समावेश होतो. आजच्या स्थितीत भारतात १६५ थिंक टॅग आहेत. बदलत्या अर्थव्यवस्थेला अनुसरून निती आयोग कार्य करणार आहे. या बदलामुळे राज्यांची स्थिती ही याचीकेची असणार नाही. तर राज्य विकासाठी स्वत्र्यता मॉडल स्विकारू शकतील हा आयोग सरकारला धोरणा बाबत सल्ला देणार आहे. हा एक धाडसी प्रयोग असून बदल ही काळाची गरज आहे. हे लक्षात घेवून निर्माण केलेला आयोग आहे.

**निती आयोगासंबंधीत अनुत्तरीत प्रश्न**

१. आगामी काळातील योजना कशा असतील?

२. १२व्या पंचवार्षिक योजनेचे काय?

३. योजनांना अंतिम मंजुरी देण्याची राष्ट्रीय विकास परिषद संपुष्टात आली काय? आता ही मजुरी प्रशासकिय परिषद देईल का? प्रशासकिय परिषद निती आयोगाचा भाग असल्यामुळे ती स्वतःच्या आराखडयावर मजुरी कशी देईल?

४. निती आयोगातील सदस्य संख्या नेमकी किती असेल?

५. १२२ वे घटना दुरूस्ती विधेयक संमत्त झाल्यानंतर केंद्र व राज्यांच्या आर्थिक संबंधासाठी ३ संस्था कार्यरत असतील-जी.एस.टी.कर परिषद, वित आयोग, निती आयोग या तिन्ही संस्थांचे कार्यक्षेत्र वेगळे असले तरी त्यांच्यात कुठल्या प्रकारचा समन्वय राहील?

६. सहकारी संघराज्य या संकल्पनेचा आवाका अस्पष्ट आहे?

७. प्रादेशिक परिषदेचे कार्यक्षेत्र व अधिकार अस्पष्ट आहे?

**संदर्भ**

१) भारतीय अर्थव्यवस्था भाग१ , डॉ. किरण जी. देसले, दीपस्तंभ प्रकाशन जळगाव

२) व्यापारी मित्र , लोकराज्य , उद्योजक

३) दै. लोकसत्ता, दै. सकाळ, दै. महाराष्ट्र टाईम्स